दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 33 ■ शुक्रवार, 24 एप्रिल 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

### सुविचार

ध्येय मिळवण्याची आशा कधीही सोडू नका, कारण सूर्य मावळल्यावरच पुन्हा सकाळ होते.




## सेमी इंग्रजीसाठीचे निकष पूर्ण होत नसल्याने तांत्रिक अडचणी

# सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्याअगोदरच विरोधाचा सूर

## न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशारा

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव - धाराशिव जिल्हा परिषदेतर्फे बुधवारी विषय सर्वसाधारण सभा घेऊन इयत्ता पहिली ते इयत्ता पाचवी या वर्गासाठी येत्या जून महिन्यापासून सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्याचा निर्णय एकमुखी घेण्यात आला. मात्र, सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले निकष पूर्ण होत नसताना सेमी इंग्रजी सुरू करण्याची घाई का केली जात आहे ? असा प्रश्न आता विचारला जात आहे. जिल्हा परिषदेच्या सभेत जरी हा निर्णय एकमुखी घेतला असला तरी सभेमध्ये काही सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर समाधानकारक चर्चा न झाल्याने सेमी इंग्रजी सुरू करण्याचा हा निर्णय पूर्वीप्रमाणे फसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



धाराशिव जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या जवळपास अकराशे शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत सेमी इंग्रजी सुरू करण्याचा निर्णय बुधवारी विशेष सर्वसाधारण सभेतएकमताने घेण्यात आला. मात्र एवढा मोठा निर्णय घेताना त्यावर सभागृहात ज्याप्रमाणे चर्चा होणे अपेक्षित होते तशी चर्चा न झाल्याने हा निर्णय घाईत घेतला जात आहे का? असा प्रश्न निर्माण होत आहे. सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यासाठी शिक्षण उपसंचालकांची परवानगी लागते अशी परवानगी मिळण्याच्या अगोदरच शिक्षण विभागाने सेमी इंग्रजी साठी आवश्यक असलेल्या गणित आणि इंग्रजी विषयांच्या पाठ्यपुस्तके मागणीचा ठराव घेतला. बुधवारी झालेल्या सभेत राष्ट्रवादीचे सदस्य महेंद्र धुरगुडे आणि शिवसेनेच्या (उबाठा) गटनेत्या कांचनमाला संगवे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर शिक्षण अधिकाऱ्यांकडे उत्तरे नव्हती. सेमी इंग्रजीसाठी इंग्रजी मधून शिक्षण घेतलेला शिक्षक असणे बंधनकारक आहे. परंतु धाराशिव जिल्ह्यात इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेले केवळ 12 शिक्षक असल्याची माहिती खुद्द शिक्षण अधिकाऱ्यांनीच दिल्यामुळे सेमी इंग्रजीचा निर्णय कितपत टिकेल अशी शंका उपस्थित होत आहे. यापूर्वी 2012-13 ते 2021-22 या कालावधीत जिल्ह्यात सेमी इंग्रजी वर्ग सुरू होते. परंतु, तत्कालीन जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांनी 'शासन निर्णयातील तरतुदींचा व राज्यघटनेतील कलमांचा विचार न करता सुरू करण्यात आलेले सेमी इंग्रजी वर्ग रद्द करण्यात येत आहेत' असा निर्णय घेतला होता. परंतु, तीच समस्या आजही कायम असताना यावेळीही घाईघाईत हा निर्णय घेतला जात आहे. त्यामुळे या निर्णयाला विरोध करणारा सूर वाढत आहे. त्यातच काहींनी या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशारा दिल्यामुळे सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यापूर्वीच अडचणी वाढणार आहेत.

### सेमी इंग्रजी सुरू करण्यासाठी असलेल्या अडचणी

१) सेमी इंग्रजी सुरू करताना प्रत्येक शाळेमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेला एक शिक्षक कार्यरत असला पाहिजे.
२) सरसकट सर्व शाळेत सेमी इंग्रजी सुरू केली तर सर्वसामान्य कमी बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ शकतो.
३) पहिली ते सातवी सेमी इंग्रजी झाली तर पुन्हा ग्रामीण भागात आठवी ते दहावी सेमी इंग्रजी नाही.
४) ग्रामीण भागातील सर्व संस्थेसहित माध्यमिक शाळा सुद्धा सेमी इंग्रजीत कराव्या लागतील.
५) सेमी इंग्रजी सुरू करण्यासाठी सर्व निकष पूर्ण होत नाहीत.

### २०२२ मध्ये सेमी इंग्रजी वर्ग बंद करताना काढलेले निष्कर्ष

१) सेमी इंग्रजी अभ्यासक्रम ऐच्छिक असतानाही तो पालक व शाळा व्यवस्थापन समितीची संमती न घेता अनिवार्यपणे राबविला.
२) इंग्रजी माध्यमातून शिकवण्यासाठी आवश्यक प्रशिक्षित शिक्षकांचा मोठा तुटवडा.
३) शासनाची आवश्यक परवानगी न घेता व सक्षम प्राधिकाऱ्याशी योग्य पत्रव्यवहार न करता सेमी इंग्रजी योजना राबविली.
४) राईट टू एज्युकेशन मधील कलम २९ (२) (फ) नुसार प्राथमिक शिक्षण मातृभाषेत देणे आवश्यक असतानाही इंग्रजी माध्यमाचा अतिरेक होत असल्याने नियमांचे उल्लंघन झाले.
५) भाषेच्या अडचणीमुळे विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान विषयातील संकल्पना नीट समजत नाहीत, विषयांची गुणवत्ता घसरली.
६) प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमातील बदलामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला.
७) ८५% पेक्षा शिक्षकांनी गणित व विज्ञान मातृभाषेतून शिकवणे अधिक प्रभावी वाटते असे सांगितले.

### सेमी इंग्रजीमुळे पटसंख्या घसरली

विशेष म्हणजे यापूर्वी सेमी इंग्रजी वर्ग सुरू केल्यानंतर आठ वर्षात जिल्हा परिषद शाळांच्या पटसंख्येत 27000 इतकी घट झाली होती. म्हणजे दरवर्षी साडेतीन हजार विद्यार्थी कमी झाले होते.

### निर्णय चांगला पण घाई होत आहे

सेमी इंग्रजी सुरु करण्याचा निर्णय चांगला आहे. परंतु त्याला घाई होत आहे. पहिली ते दहावीपर्यंत सेमी इंग्रजी सुरु करावे परंतु, त्यासाठी आपल्याकडे शिक्षक उपलब्ध आहेत का? याचा विचार व्हायला हवा. सभागृहात यावर सखोल चर्चा होणे अपेक्षित होते. परंतु, या निर्णयामागे राजकारण दिसत असल्यामुळे यावर चर्चा केली नाही.

**कांचनमाला संगवे**
गटनेत्या, शिवसेना (उबाठा).

### जिल्हा परिषदेला विषयाचे माध्यम ठरवण्याचा अधिकारच नाही

जिल्हा परिषदेला शाळेचे माध्यम किंवा विषयाचे माध्यम ठरवण्याचा मूळात अधिकारच नाही. केवळ ठरावाच्या आधारे अंमलबजावणी झाल्यास मुख्याध्यापकासह सर्वच अधिकारी गोत्यात येतील. कारण सेमीची एक तुकडी चालू करायची झाल्यास शिक्षण उपसंचालकांची परवानगी आवश्यक असते. शासनाची परवानगी व उपसंचालकांचे पत्र असल्याशिवाय मुख्याध्यापक सेमी इंग्रजी माध्यम सुरूच करू शकत नाहीत. तसे केल्यास याविरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल.

**ॲड. महेबूब काझी**

## निपाणी शिवारात वृद्ध महिलेचा खून

### विहिरीत ढकलून हत्या केल्याचा आरोप

आरंभ मराठी । वाशी

भुम तालुक्यातील निपाणी शिवारात एका 60 वर्षीय वृद्ध महिलेची विहिरीत ढकलून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत राम महाकले (रा. लांजेश्वर, ता. भुम) व गणेश राजेंद्र गिरी (रा. आंद्रुड, ता. भुम) यांनी दिनांक 21 एप्रिल 2026 रोजी पहाटे 00.30 ते सकाळी 08.00 वाजण्याच्या दरम्यान निपाणी शिवारातील एका विहिरीजवळ बदामबाई सुर्यभान गिते (वय 60, रा. आंद्रुड, ता. भुम) यांना अज्ञात कारणावरून जबरदस्तीने विहिरीत ढकलून ठार मारल्याचा आरोप आहे. या घटनेबाबत मयत महिलेचे पती सुर्यभान एकनाथ गिते (वय 70) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 103(3) व 3(5) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## बसस्थानकावरील गर्दीचा फायदा घेत ४३.५०० रुपयांची चोरी

आरंभ मराठी । कळंब

कळंब येथील बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका प्रवाशाच्या खिशातील रोख रक्कम लंपास केल्याची घटना समोर आली आहे. याबाबत कळंब पोलीस ठाण्यात नोंदविलेल्या फिर्यादीनुसार, निलेश विष्णुदास मालपानी (वय ३६, रा. बालाजी मंदिर मारवाडी गल्ली, कळंब) हे दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.३० ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान कळंब बसस्थानक येथे कळंब-धाराशिव बसमध्ये चढत होते. यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पॅन्टच्या खिशातील एकूण ४३,५०० रुपये रोख रक्कम चोरून नेली. या घटनेची फिर्याद निलेश मालपानी यांनी कळंब पोलीस ठाण्यात दिली असून, पोलिसांनी भा.न्या.सं. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## क्यूआर कोडद्वारे 'आपले सरकार' सेवा अधिक पारदर्शक

**धाराशिव** :-जिल्ह्यातील नागरिकांना शासनाच्या सेवा अधिक पारदर्शक, जलद आणि नागरिकाभिमुख पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या निर्णयानुसार, जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये तसेच 'आपले सरकार' सेवा केंद्रांवर विविध प्रकारचे क्यूआर कोड दर्शनी भागात लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत अभिप्राय (फीडबॅक) क्यूआर कोड, सेवा शुल्क क्यूआर कोड, अधिसूचित सेवांची यादी दर्शविणारा क्यूआर कोड तसेच जिल्ह्यातील 'आपले सरकार' केंद्रांचे ठिकाण दर्शविणारा क्यूआर कोड यांचा समावेश करण्यात आला आहे. या डिजिटल सुविधेमुळे नागरिकांना आवश्यक माहिती जलद आणि सहज मिळणार असून, सेवा प्रक्रियेत पारदर्शकता वाढणार आहे. अभिप्राय क्यूआर कोडद्वारे नागरिकांना संबंधित सेवा केंद्रांना ५ गुणांच्या रेटिंग प्रणालीत आपले मत नोंदवता येणार आहे.

## पवनचक्की ट्रान्सफॉर्मर फोडून ३५ लाखांचे नुकसान कॉपर वायरची चोरी

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील चिकुंद्रा शिवारात अज्ञात चोरट्यांनी पवनचक्की प्रकल्पावर दरोडा टाकत ट्रान्सफॉर्मरचे नुकसान करून लाखोंची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८ ते रात्री ८ या दरम्यान अज्ञात इसमांनी चिकुंद्रा शिवारातील आर.एस.एल. पवनचक्की लोकेशनवरील ट्रान्सफॉर्मरचे कॉपर वायर कापून नुकसान केले. तसेच ट्रान्सफॉर्मरमधील सुमारे २,६०० लिटर ऑईल काढून टाकत अंदाजे २ लाख ८० हजार ८०० रुपयांचे नुकसान केले. याचबरोबर ट्रान्सफॉर्मरमधील कॉपर वायर व बसबार चोरून नेण्यात आले असून त्याची किंमत सुमारे १ लाख रुपये आहे. या सर्व प्रकारामुळे ट्रान्सफॉर्मर पूर्णतः निकामी झाला असून एकूण सुमारे ३५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादी पांडुरंग माणिक गरड (वय ३५, रा. चिकुंद्रा ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि. २२ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३(२), ३२४(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीसांकडून सुरू आहे.

आरंभ मराठी

## नगरपरिषदेची धडक कारवाई; चार दिवसांत संपूर्ण शहर अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्धार

# तुळजापुरात अतिक्रमण हटाव मोहीम जोरात; भवानी रोड-महाद्वार रोड मोकळे

आरंभ मराठी । तुळजापूर

तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे वाढत्या अतिक्रमणाच्या समस्येला अखेर आळा घालण्यासाठी नगरपरिषदेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेण्यात आली आहे. गुरुवारी (दि.२३) सकाळी ११ वाजता या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. भवानी रोड, महाद्वार रोड तसेच मंदिर परिसरातील अतिक्रमणांवर नगरपालिकेने थेट हातोडा चालवत कारवाई केली. दुपारी तीन वाजेपर्यंत ही मोहीम सुरू राहिली. आगामी चार दिवस संपूर्ण शहरात ही कारवाई राबविण्यात येणार असल्याची माहिती नगरपरिषदेकडून देण्यात आली. तुळजापूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी



येत असतात. मात्र गेल्या काही वर्षांत शहरातील प्रमुख रस्ते, मंदिर परिसर व शासकीय जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले होते. त्यामुळे वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि सुरक्षेच्या समस्या निर्माण होत होत्या. यामुळे भाविकांसह स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेने कठोर भूमिका घेत अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात केली. या मोहिमेत तीन जेसीबी, ट्रॅक्टर, ब्रेकर मशीन तसेच शेकडो कर्मचारी तैनात करण्यात आले होते. नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी, तुळजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस, मंदिर संस्थानचे कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांच्या उपस्थितीत आणि कडक पोलिस बंदोबस्तात कारवाई पार पडली. मोहिमेची पूर्वकल्पना मिळाल्याने अनेक व्यापाऱ्यांनी आपली अतिक्रमणे स्वखुशीने काढून घेतली होती. उर्वरित अतिक्रमणांवर मात्र नगरपरिषदेने थेट कारवाई करत रस्त्याच्या दुतर्फा उभारण्यात आलेल्या बांधकामांवर ब्रेकरच्या साहाय्याने पाडकाम केले. विशेषतः भवानी रोड, महाद्वार रोड आणि मंदिर परिसरातील अतिक्रमणे पूर्णपणे हटविण्यात आली. त्यामुळे या भागातील रस्ते मोकळे झाले असून वाहतुकीला मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांकडून या कारवाईचे स्वागत करण्यात येत असले तरी ही मोहीम सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान नगराध्यक्ष विनोद गंगणे, मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे, नगरसेवक सागर कदम, नरेश अमृतराव यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कारवाईवर लक्ष ठेवले.

### कारवाईचे स्वागत मात्र, मोहीम संपूर्ण शहरात राबवावी

या कारवाईचे स्वागत आहे. मात्र शहरातील इतर भागांतील अतिक्रमणही तातडीने काढण्यात यावेत. विशेषतः लातूर रोड, धाराशिव रोड, नळदुर्ग रोड तसेच विविध शासकीय कार्यालयांच्या परिसरातील अतिक्रमणे हटविणे गरजेचे आहे. ही मोहीम संपूर्ण शहरात राबविण्यात यावी.

**अमोल कुतवळ**
काँग्रेस गटनेते.

### चार दिवस मोहीम सुरू राहणार

नगरपरिषद प्रशासनाने ही मोहीम केवळ एकदाच मर्यादित न ठेवता सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आगामी चार दिवसांत शहरातील सर्व प्रमुख रस्ते व भाग अतिक्रमणमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यामुळे तुळजापूर शहर अधिक सुटसुटीत, सुरक्षित व भाविकांसाठी सोयीचे होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## खरीप 2026 साठी सोयाबीन बियाणे अर्ज सुरू; प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य



आरंभ मराठी । मुरुड

महाराष्ट्र कृषी विभागामार्फत महा-डिबीटी पोर्टलवर खरीप हंगामासाठी सोयाबीन बियाण्यांच्या ऑनलाईन अर्ज प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तातडीने अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानित दरात दर्जेदार सोयाबीन बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहेत. विशेष म्हणजे, यावर्षी अर्जदारांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर केली जाणार असल्यामुळे विलंब न करता अर्ज सादर करणे अत्यावश्यक आहे. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून, शेतकऱ्यांनी महा-डिबिटी पोर्टलवर स्वतः नोंदणी करावी किंवा जवळच्या महा-ई सेवा केंद्रामार्फत अर्ज भरावा. अर्ज करताना आधार कार्ड, ७/१२ उतारा, बँक खाते तपशील आणि मोबाईल क्रमांक यांसारखी आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. अर्ज सादर केल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना पुढील प्रक्रियेबाबत माहिती संदेशाद्वारे कळविण्यात येणार असून, शासनाच्या नियमानुसार बियाण्यांचे वितरण केले जाईल. शेतकऱ्यांनी अर्ज भरताना अचूक माहिती द्यावी आणि अंतिम मुदतीपूर्वी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी बनसोडे ए. बी. (मुरुड) यांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी विद्यालयाचे ऑलिम्पियाडमध्ये यश

## ३४ पदकांची कमाई




आरंभ मराठी । वाशी

वाशी येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत तब्बल १४ सुवर्ण, १० रौप्य व १० कांस्य अशी एकूण ३४ पदके पटकावली.इंग्लिश, गणित, सायन्स व लॉजिकल रिझनिंग या विविध ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय क्रमांक, एक्सलंट अवॉर्ड व शिष्यवृत्तीदेखील मिळवल्या. विशेषतः संस्कृती जाधव, प्राजक्ता कावळे, विश्वजीत जाधव आदी विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर उल्लेखनीय स्थान मिळवले. या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक थोरबोले सर, पर्यवेक्षक सावंत सर तसेच सर्व शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## 'युद्ध नको बुद्ध हवा' संदेशाने बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुपच्या वतीने भीम जयंती साजरी

# मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत डॉल्बीमुक्त मिरवणुकीतून भीम जयंतीत ऐक्याचा संदेश

आरंभ मराठी । धाराशिव



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिवमध्ये बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भीम जयंती उत्सव यंदाही आदर्श ठरला. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती आणि त्यांचा साधेपणाने बहुजन समाजाशी संवाद. जयंती सोहळ्यास येताना त्यांनी कोणत्याही प्रकारचे हार-तुरे किंवा औक्षण न स्वीकारता थेट भीमनगरमधील आयोजक धनंजय (नाना) शिंगाडे यांच्या घरी भेट देत बहुजन समाजाच्या समस्या जाणून घेतल्या. या कृतीमुळे उपस्थितांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. त्यांच्या आरक्षण आंदोलनाला धाराशिव जिल्ह्याने दिलेल्या पाठिंब्याचा उल्लेख करत मान्यवरांनी त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. यंदाच्या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदाचा बहुमान प्रथमच ग्रामीण भागातील प्रवीण आबा सूर्यवंशी यांना देण्यात आला.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध धर्मगुरूंची एकत्र उपस्थिती. वारकरी संप्रदाय, मुस्लिम समाज आणि बौद्ध धम्माचे प्रतिनिधी एकाच व्यासपीठावर येऊन सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. तसेच जातमुक्त गाव संकल्पना राबवणाऱ्या सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे पाटील यांचा विशेष सन्मान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, शाहू महाराज यांसारख्या महापुरुषांचे विचार सर्व समाजासाठी प्रेरणादायी असल्याचा संदेश या उत्सवातून देण्यात आला. जगभरातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर 'युद्ध नको बुद्ध हवा' या संकल्पनेवर आधारित गौतम बुद्ध यांचा देखावा सादर करण्यात आला, ज्याने सर्वांचे लक्ष वेधले आणि शांततेचा संदेश दिला. दरवर्षीप्रमाणे यंदाही मिरवणूक डॉल्बीमुक्त ठेवण्यात आली. जिल्हा पोलीस प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत पारंपरिक वाद्यांच्या गजरात शिस्तबद्ध आणि शांततेत मिरवणूक पार पडली. त्यामुळे सामाजिक ऐक्य, परंपरा आणि शिस्त यांचा सुंदर संगम धाराशिवच्या भीम जयंती उत्सवात पाहायला मिळाला.

# सिरसाव शिवारात अवकाळी पावसामुळे शेती व घरांचे मोठे नुकसान

आरंभ मराठी । परंडा



परंडा तालुक्यातील सिरसाव परिसरात बुधवारी सायंकाळी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. सायंकाळच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात पावसाची सुरुवात झाली. या नैसर्गिक आपत्तीमुळे सिरसाव, लोणी आसू, वाकडी जवळा आदी गावांमध्ये घरांची पडझड झाली असून अनेक ठिकाणी पत्र्यांची छप्परे उडून गेली. वादळी वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने शेतातील उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. विशेषतः आंबा बागांना या पावसाचा मोठा फटका बसला असून फळे झाडांवरून खाली पडल्याने शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागला. तसेच परंडा तालुका ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जात असताना, येथील शेतकऱ्यांनी साठवून ठेवलेल्या ज्वारीच्या कडव्याच्या गंजी वाऱ्यामुळे उडून गेल्या. काही ठिकाणी या गंजी विखुरल्याने जनावरांच्या चाऱ्याचीही टंचाई निर्माण झाली आहे. अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# कळंब शहरात अवेळी वीज भारनियमन, नागरिक संतापले

आरंभ मराठी । कळंब

कळंब शहरात सध्या सततच्या लोडशेडिंगमुळे नागरिक त्रस्त झाले असून महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. एकीकडे शासनाने स्मार्ट मीटरची अंमलबजावणी केली असली तरी, दुसरीकडे महावितरणचे कर्मचारी मात्र अद्याप 'स्मार्ट' झालेले नाहीत, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने तापमानात मोठी वाढ झाली आहे. त्यातच वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. दिवसभराच्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.शहरातील अनेक भागात कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित केला जातो. त्यामुळे व्यापारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.



### हेल्पलाईन नंबर फक्त नावालाच ?

महावितरणचा हेल्पलाईन नंबर हा केवळ नावालाच असल्याची भावना नागरिकांत निर्माण झाली आहे. वीज कधी येणार याची माहिती घेण्यासाठी नागरिक वारंवार फोन करतात; मात्र बहुतेक वेळा नंबर व्यस्त लागतो. कधी कॉल लागलाच, तर संबंधित कर्मचारी फोन उचलण्याची तसदी घेत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.एकूणच, स्मार्ट मीटरच्या नावाखाली तंत्रज्ञानाचा वापर वाढत असला तरी सेवा मात्र सुधारलेली दिसत नाही. त्यामुळे महावितरणने नागरिकांच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन तातडीने वीजपुरवठा सुरळीत करावा, तसेच हेल्पलाईन सेवा प्रभावी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे ३५ विद्यार्थी पोलीस भरतीत यशस्वी

आरंभ मराठी । धाराशिव

रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या पोलीस भरती प्रक्रियेत उल्लेखनीय यश संपादन करत एकूण ३५ विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य बाळासाहेब शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्राचार्य डॉ. देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत महाविद्यालयात लवकरच पोलीस भरतीसाठी विशेष प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा मानस व्यक्त केला. यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल, असे त्यांनी सांगितले. या भरती प्रक्रियेत महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना (NCC) विभाग व स्पर्धा परीक्षा विभागाचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ झाला. एनसीसी विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. केशव क्षीरसागर तसेच स्पर्धा परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ. मारुती अभिमान लोंढे यांच्या कार्याचे प्राचार्यांनी विशेष कौतुक केले. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये आकाश अण्णा कोळगे याने धाराशिव जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर महिला गटातून अंकिता मोहन यादव हिने जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवले. यावेळी विजय गायकवाड, दिनेश गायकवाड, गणेश गायकवाड, रोहित घोडके, शितल पवार, कल्याणी मिसाळ, उमर शेख, सागर पराडे आदी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामार्फत करण्यात आले होते. यासाठी समन्वयक डॉ. मंगेश भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी केले, प्रास्ताविक डॉ. बी. डब्ल्यू. गुंड यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन प्रा. माधव उगिले यांनी केले.

# देविदास बंडगर यांचे हृदयविकाराने निधन



**येणेगूर** :- येणेगूर येथील देविदास रामराव बंडगर (वय 60 वर्ष) यांचे बुधवारी सायंकाळी साडेसहा वाजता हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर गुरुवार (दि. 23) रोजी येणेगूर येथील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ व नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते येणेगूर येथील माजी शिवसेना शाखाप्रमुख तुळशीदास बंडगर यांचे लहान भाऊ होत. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# सावरगाव प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

## मंथन स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार

आरंभ मराठी । तुळजापूर




तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला सावरगाव येथे गुरुवारी (दि.23) राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. इयत्ता 3 री व 4 थीतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय मंथन स्पर्धेत तालुक्यात उल्लेखनीय क्रमांक पटकाविल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या वंदना आलमद, मनीषा एखंडे, अजित इंगळे व विजय नारायणकर या शिक्षकांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याचवेळी 14 एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक रंगनाथ डोलारे यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक रमाकांत गुरव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अतुल पवार, सदस्य कानिफनाथ माळी, सिद्धेश्वर काडगावकर, बालाजी फंड, योगेश काळदाते, गोकुळ शिंदे, सुनील शिंदे तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन भारती तुपेरे यांनी मानले.

# तुळजापुरात राष्ट्रीय भू-अलंकरण दिनानिमित्त भव्य रांगोळी रेखाटन

## संस्कार भारतीचा उपक्रम उत्साहात



आरंभ मराठी । तुळजापूर

राष्ट्रीय भू-अलंकरण दिनाच्या निमित्ताने तुळजापूर येथील डुल्या मारुती मंदिर परिसरात आकर्षक व भव्य रांगोळी रेखाटनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा उपक्रम तुळजापूर संस्कार भारती संयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. संस्कार भारतीच्या वतीने देशभरात दरवर्षी 22 एप्रिल रोजी राष्ट्रीय भू-अलंकरण दिन साजरा केला जातो. त्यानिमित्त धाराशिव जिल्हा समिती अंतर्गत तुळजापूर येथे विविध रंगांचा वापर करून सुंदर व देखणी रांगोळी साकारण्यात आली. या रांगोळीत भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवत पारंपरिक कलात्मकतेचा उत्कृष्ट नमुना पाहायला मिळाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी नगरसेविका सौ. प्रगती गोपाळ कदम यांच्या हस्ते पहिला बिंदू सोडण्यात आला तसेच पणती प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी त्यांनी शहरवासीयांना राष्ट्रीय भू-अलंकरण दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी प्रांताचे सह महामंत्री डॉ. सतीश महामुनी यांनी राष्ट्रीय रांगोळी दिनाचे महत्त्व स्पष्ट करत तुळजापूरमधील रांगोळी परंपरेविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच तालुक्यातील कलाकारांनी संस्कार भारतीच्या 'संस्कार मित्र' उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाला सह महामंत्री डॉ. सतीश महामुनी, दृश्य विधा प्रमुख शेषनाथ वाघ, प्रांत चित्रकला प्रमुख पद्माकर मोकाशे, जिल्हा उपाध्यक्ष प्रफुल्ल कुमार शेटे, नगरसेविका प्रगती गोपाळ कदम, माजी उपनगराध्यक्ष विनोद खपले, जय अंबिका मंडळाचे कालिदास कदम, मंदिराचे उपाध्ये बंडोपंत पाठक, भाजपाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब शामराज, काँग्रेसचे नेते हनुमंत साठे, विवेकानंद कनगरकर, कोषाध्यक्ष अविनाश धट, पत्रकार अनिल आगलावे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमात अध्यक्ष सौ. अपर्णाताई शेटे, जिल्हा भू-अलंकरण प्रमुख लक्ष्मीकांत सुलाखे, प्रांत चित्रकला प्रमुख पद्माकर मोकाशे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रफुल्ल कुमार शेटे, माधुरी कनगरकर, गीता व्यास, गीता रसाळ, रतन मस्के, महेश कुलकर्णी, अविनाश घट, डॉ. सतीश महामुनी आदींनी सहभाग घेत आकर्षक रांगोळी साकारली. कार्यक्रमादरम्यान गीतगायनाने वातावरण अधिक रंगतदार झाले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संगीता रसाळ यांनी केले.

# उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलचा परसबाग स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक; १४ हजारांचे बक्षीस

आरंभ मराठी । उमरगा



उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलने 'प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना' अंतर्गत आयोजित परसबाग निर्मिती स्पर्धेत यंदा उमरगा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत १४ हजार रुपयांचे रोख बक्षीस मिळविले आहे. तसेच जिल्हास्तरावरही शाळेला उत्तेजनार्थ पारितोषिकाने गौरविण्यात आले आहे. मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या परसबाग उपक्रमाने यापूर्वीही उल्लेखनीय यश मिळवले असून, गेल्या वर्षी तालुकास्तरावर द्वितीय क्रमांकासह ५ हजार रुपयांचे बक्षीस मिळाले होते. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शाळांमध्ये परसबाग विकसित करून त्यातून उत्पादित भाजीपाला शालेय पोषण आहारात वापरण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या संयुक्त सहभागातून उभारण्यात आलेल्या या परसबागेत दोडका, भेंडी, भोपळा, वांगे, मिरची, टोमॅटो यांसह पालक, मेथी, कोथिंबीर, शेवगा आदी विविध फळभाज्या व पालेभाज्यांचे उत्पादन घेण्यात आले. मायक्रोग्रीन तंत्रज्ञानाचा वापर करून कमी पाण्यात भाजीपाला पिकविण्यात यश आले आहे. तसेच सेंद्रिय शेतीला प्राधान्य देत गांडूळ खत निर्मिती प्रकल्प उभारून सिंचन व्यवस्थाही कार्यक्षम करण्यात आली आहे. उत्पादित भाजीपाल्याचा उपयोग शालेय पोषण आहारात नियमितपणे करण्यात येत असून, उर्वरित भाजीपाल्याची विक्री करून शाळेला आर्थिक लाभही झाला आहे. या परसबागेची पाहणी करण्यासाठी तालुका व जिल्हास्तरीय अधिकारी तसेच मान्यवरांनी भेट देत उपक्रमाचे कौतुक केले आहे. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुजाता मोरे, शकुंतला मोरे, अशोक पतगे, सदानंद शिवदे पाटील, अमर वरवटे यांनी या उपक्रमाचे अभिनंदन केले. तसेच या परसबागेमुळे परिसरातील नागरिक व पालकांनाही ताजा व सेंद्रिय भाजीपाला उपलब्ध झाला आहे. या यशस्वी उपक्रमासाठी धनराज तेलंग, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, सदानंद कुंभार, नागेशस्वामी, प्रवीण शिंदे, सोनाली मुसळे, भाग्यश्री पंडित, वर्षाराणी पाटील, वनमाला वाले, सुनिता राठोड, कविता केदारे, सुमन साठे यांसह सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे परिश्रम मोलाचे ठरले.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा तडाखा; ९ एकर पपई बाग जमीनदोस्त, शेतकरी संकटात

# आरंभ मराठीच्या वृत्ताची दखल

## प्रशासनाकडून नुकसानीचा तत्काळ पंचनामा

आरंभ मराठी । परंडा

**परंडा तालुक्यात मंगळवारी रात्री अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. शिरसाव येथील शेतकरी शहाजी मिसाळ यांच्या सुमारे १५ एकर क्षेत्रातील पपई बागेचे मोठे नुकसान झाले असून त्यापैकी सुमारे ९ एकर क्षेत्रातील बाग पूर्णतः जमीनदोस्त झाली आहे. एका रात्रीत हाता-तोंडाशी आलेला उत्पन्नाचा स्रोत उद्ध्वस्त झाल्याने मिसाळ कुटुंब हवालदिल झाले आहे. याचे वृत्त दैनिक आरंभ मराठीने गुरुवारी प्रसिद्ध केल्यानंतर प्रशासनाकडून नुकसानीचा तत्काळ पंचनामा करण्यात आला.**



मंगळवारी रात्री अचानक वाऱ्याचा वेग प्रचंड वाढला आणि त्यासोबत मुसळधार पावसाने हजेरी लावली. या वादळी वाऱ्यामुळे पपईची झाडे मुळासकट उन्मळून पडली, तर अनेक झाडांवरील फळांचेही मोठे नुकसान झाले. काही दिवसांत उत्पन्न मिळण्याची अपेक्षा असताना अचानक आलेल्या या संकटामुळे शेतकरी कुटुंबावर मोठा आर्थिक आघात झाला आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप मिळालेली नसताना यंदा पुन्हा निसर्गाचा फटका बसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. "एका रात्रीत सर्व काही उद्ध्वस्त झाले. मोठ्या कष्टाने उभी केलेली बाग डोळ्यादेखत पडली," अशी व्यथा शहाजी मिसाळ यांनी व्यक्त केली. दरम्यान, या घटनेचे वृत्त 'आरंभ मराठी'ने प्रसिद्ध करताच प्रशासनाने तत्काळ दखल घेतली. दिनांक २३ एप्रिल रोजी दुपारी साडेबारा वाजता ग्रामविकास अधिकारी विकास मदने, कृषी सहाय्यक जाधव व तलाठी गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त बागेचा पंचनामा केला. प्रशासनाच्या या तत्परतेचे शेतकऱ्यांकडून स्वागत करण्यात आले. परिसरातील इतर शेतकऱ्यांच्याही पिकांचे नुकसान झाले असून सर्वच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी जोर धरत आहे. सततच्या अवकाळी पावसामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत असून शासनाने त्वरित मदतीचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जिल्हा परिषद सदस्य धनंजय सावंत यांची भेट

जवळा सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य धनंजय सावंत यांनीही शहाजी मिसाळ यांच्या शेताला भेट देत नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना पंचनामे काळजीपूर्वक व अचूक करण्याच्या सूचना दिल्या. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य केदार पाटील यांच्यासह शिरसाव गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरीचा नवा केंद्रबिंदू ठरणार भारत देश

## प्रांतपाल लातुरे यांचा ठाम विश्वास




आरंभ मराठी । धाराशिव

रोटरीच्या जागतिक विस्तारात भारताची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करत डिस्ट्रिक्ट 3132 चे प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी धाराशिवमध्ये सेवा उपक्रमांचे कौतुक केले. रोटरी क्लब धाराशिवच्या पुढाकाराने झालेल्या या दौऱ्याने स्थानिक स्तरावरील कामांची दखल घेत, पुढील वाटचालीचा स्पष्ट रोडमॅपही दिला. दौऱ्यादरम्यान शिक्षण, समाजसेवा आणि सार्वजनिक प्रतिमा या तिन्ही आघाड्यांवर क्लबने उभे केलेले काम ठळकपणे पुढे आले. ए. पी. प्राथमिक शाळेत 'हॅपी स्कूल' उपक्रमांतर्गत उभारलेल्या सुविधांनी प्रांतपालांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबत स्वच्छता आणि गुणवत्ता यावर दिलेला भर हा ग्रामीण शिक्षणासाठी आदर्श ठरू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील रोटरी ब्रँडिंग बोर्डाचे उद्घाटन करताना सेवा दिसली पाहिजे, तेव्हाच समाज जोडला जातो,असा संदेश देत रोटरीच्या कार्याला दृश्यमानता मिळवून देण्यावर त्यांनी भर दिला.उंबरे कोठा येथील कार्यक्रमात सन्मान सोहळ्याने वेगळीच उंची गाठली. विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांना पुरस्कार देत रोटरीने 'काम करणाऱ्यांची दखल' ही भूमिका ठळक केली. युवा उद्योजक अनिल सावंत आणि समाजकार्य करणारे मयूर काकडे यांना विशेष पुरस्कार देऊन प्रेरणादायी उदाहरण समोर ठेवण्यात आले. मार्गदर्शन करताना प्रांतपाल लातुरे यांनी सांगितले, रोटरी म्हणजे केवळ प्रकल्प नव्हे, तर समाजात बदल घडवण्याची चळवळ आहे.'Service Above Self' हा मंत्र केवळ घोषवाक्य न ठेवता प्रत्यक्ष कामातून सिद्ध करण्याचे आवाहन त्यांनी केले. क्लब अध्यक्ष रणजीत रणदिवे यांनी वर्षभरातील कामांचा आढावा घेताना आगामी प्रकल्पांची दिशा स्पष्ट केली, तर सचिव प्रदीप खमकर यांनी आभार प्रदर्शन केले. दौऱ्यास जिल्हास्तरीय पदाधिकारी आणि रोटेरियन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिवमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे वक्ता प्रशिक्षण शिबिर उत्साहात




आरंभ मराठी । धाराशिव

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हा कार्यालयात वक्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला कार्यकर्ते व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या शिबिरात मुख्य मार्गदर्शक म्हणून जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील तसेच वक्ता प्रशिक्षण विभागाचे जिल्हाध्यक्ष तेजस भालेराव यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रभावी वक्तृत्वाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी "वक्ता कसा असावा, प्रभावी संवाद कसा साधावा आणि समाजापर्यंत विचार प्रभावीपणे कसे पोहोचवावेत" याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यकर्त्यांना सार्वजनिक जीवनात संवाद कौशल्य विकसित करण्याची दिशा मिळाली. कार्यक्रमाला जीवनरावजी गोरे, कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, लीगल जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कसले, ॲड. अविनाश जाधव, शिक्षक सेल जिल्हाध्यक्ष प्रा. जालिंदर पोळ, ॲड. योगेश सोन्नेपाटील, नगरसेवक पंकज भोसले, सुनील आंबेकर, नरसिंह मेटकरी, अभियंता सेल जिल्हाध्यक्ष सुरज वडवले, ॲड. बाळासाहेब आवड, जिंक्राईल पटेल, चेतन वाघमारे, गोपाळ टेकळे, किरण रोकडे, प्रा. तूरूप सर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# मंथन स्पर्धा परीक्षेत बालसंस्कार विद्यामंदिरचे ८ विद्यार्थी यशस्वी



**वाशी** :- मंथन स्पर्धा परीक्षेच्या निकालात बालसंस्कार प्राथमिक विद्यामंदिर, वाशी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत जिल्ह्यात आपली वेगळी छाप पाडली आहे. यावर्षी शाळेच्या विद्यार्थ्यांनी जिल्ह्यात सर्वाधिक गुणवत्ताधारक होण्याचा मान मिळवला आहे. इयत्ता पहिलीतील वैभवी प्रमोद शिंदे हिने जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकावला असून सिया सुशांत जगदाळे हिने चौथा, तर विराज अशोक शेळके याने पाचवा क्रमांक मिळवला. इयत्ता दुसरीतील माही किरण चौधरी व वेदांगी हरिश्चंद्र केळे यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवत उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली. तसेच तनिया सुहास गपाट हिने तिसरा, तर अवनी साहेबराव जगताप हिने पाचवा क्रमांक मिळवला. इयत्ता तिसरीतील राजवर्धन संतोष माने याने जिल्ह्यात पाचवा क्रमांक मिळवून यशाची परंपरा कायम राखली.याशिवाय इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांपैकी एकूण २४ विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरावर गुणवत्ताधारक ठरून प्रशालेचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामागे विद्यार्थ्यांना लाभलेले मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले असून श्रीमती अलका कुंभार, सत्यभामा तौर, मनीषा कवडे, यशोदा कारंडे, दामिनी देसाई, उत्तम कावरे व संतोष माने यांनी विद्यार्थ्यांना योग्य दिशा दिली.

# रस्ता सुरक्षा मोहिमेला सेलिब्रिटींचा चेहरा

## एसटीसाठी रितेश-जेनेलिया देशमुख ब्रँड ॲम्बेसेडर




आरंभ मराठी । मुंबई

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) 'रस्ता सुरक्षा अभियाना'ला आता ग्लॅमरचा स्पर्श मिळाला आहे. प्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांची पुढील पाच वर्षांसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली असून जनजागृती मोहिमेला बळ मिळणार आहे.या नियुक्तीचा करार हस्तांतरण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत पार पडला. मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याने मोहिमेला अधिकृत बळ मिळाले.एसटी आणि परिवहन खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृती उपक्रमांना अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याचा सरकारचा हेतू आहे. 'रस्ता सुरक्षा' हा केवळ संदेश न राहता जनचळवळ व्हावी, यासाठी लोकप्रिय चेहऱ्यांची निवड करण्यात आली आहे.रस्ता सुरक्षा, प्रवासी जनजागृती आणि सामाजिक संदेशांचा व्यापक प्रसार करण्यासाठी रितेश-जेनेलिया यांचा सहभाग निर्णायक ठरणार आहे.

# गुंजोटी येथे खरीपपूर्व शेतकरी प्रशिक्षणात माती परीक्षणाचे महत्त्व अधोरेखित

**उमरगा** :- उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर आयोजित शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडला. बुधवार (दि. २२) रोजी झालेल्या या कार्यक्रमात माती परीक्षणाचे महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले. यावेळी गुंजोटी येथे "फार्मर्स माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळे"चे उद्घाटन तालुका कृषी अधिकारी डी. बी. रितापुरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रयोगशाळेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची अचूक तपासणी करून योग्य पीक नियोजन व खत व्यवस्थापन करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.प्रशिक्षणादरम्यान माती परीक्षणाची प्रक्रिया, त्याचे फायदे, पिकांच्या वाढीसाठी आवश्यक अन्नद्रव्यांचे संतुलन, तसेच खरीप हंगामासाठी करावयाचे नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. माती परीक्षण केल्यास उत्पादनात वाढ होऊन खर्चात बचत होते, त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने नियमितपणे माती परीक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी डी. बी. रितापुरे, मंडळ कृषी अधिकारी प्रदीप भोसले, उप कृषी अधिकारी सुनील कुलकर्णी, गुंजोटी गावचे माजी सरपंच पाटील तसेच तालुक्यातील सर्व सहाय्यक कृषी अधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १३२ गावांसाठी संपर्क अधिकारी नियुक्त समन्वित विकासासाठी जिल्हा प्रशासनाची पावले


आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यातील १३२ गावांसाठी संपर्क अधिकाऱ्यांच्या नियुक्ती संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच आढावा बैठक आयोजित करण्यात आली. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.बैठकीस सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी तसेच सर्व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते. बैठकीत तालुकास्तरावर निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये संबंधित योजनेची प्रभावी व व्यापक प्रचार-प्रसिद्धी करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच विविध विभागांच्या योजनांचे अभिसरण साधून गाव हा विकासाचा केंद्रबिंदू मानून क्षेत्रीय पातळीवर सर्वांगीण व समन्वित विकास साधण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले. प्रत्येक नियुक्त संपर्क अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील गावांना महिन्यातून किमान दोन वेळा भेट देऊन योजनांची अंमलबजावणी, प्रगती व अडचणींचा आढावा घ्यावा तसेच संबंधित बाबींचा नियमित पाठपुरावा करावा,अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत विविध घटकांमध्ये लाभार्थी अर्जाची संख्या वाढविण्यासाठी विशेष मोहिमा राबविणे तसेच जल व मृदसंधारणाची कामे प्राधान्यक्रमाने क्षेत्रीयस्तरावर तातडीने सुरू करण्याबाबत निर्देश देण्यात आले. याशिवाय, जलतारा प्रकल्पांतर्गत नाम फाऊंडेशन तसेच इतर स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून "प्रति एकर एक जलतारा" हा उपक्रम जिल्ह्यात पथदर्शी स्वरूपात राबविण्याचे ठरविण्यात आले.या प्रकल्पासाठी गावनिहाय इच्छुक शेतकऱ्यांच्या याद्या तात्काळ संकलित करून त्या संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांमार्फत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी यांनी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून ठरविण्यात आलेल्या बाबींची प्रभावी अंमलबजावणी करावी व निश्चित कालमर्यादेत अपेक्षित उद्दिष्टे साध्य करावीत,असे निर्देश दिले.

दैनिक आरंभ मराठी | पाचशे क्विंटल कांदा चिखलात; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान, तात्काळ मदतीची मागणी

# अवकाळी पावसाचा तडाखा; वाठवडा येथे कांदा पिकाची मोठी हानी


आरंभ मराठी । पळसप



कळंब तालुक्यातील वाठवडा परिसरात मंगळवारी झालेल्या गारपीट व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेतला असून, काढणी करून साठवणुकीस ठेवलेला कांदा अक्षरशः चिखलात मिळाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अचानक कोसळलेल्या पावसामुळे साठवलेल्या कांद्याच्या गंजीत पाणी साचून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पावसाचे पाणी थेट साठवणुकीत शिरल्याने कांदा पूर्णपणे भिजून कुजण्यास सुरुवात झाली आहे. वाठवडा परिसरात सर्वत्र कांद्याच्या गंजी चिखलात बदलल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत असून, शेतकरी वर्गावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. या घटनेत येथील शेतकरी चरणसिंह राऊत यांचा सुमारे २०० क्विंटल, तर महेश पवार यांचा अंदाजे १५० क्विंटल कांदा खराब झाला आहे. एकूण साडे चारशे ते पाचशे क्विंटल कांदा पिकाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या नुकसानीमुळे संबंधित शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. सध्या बाजारात कांद्याचे दर समाधानकारक नसतानाच उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यातच अवकाळी पावसाचा फटका बसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. वर्षभर कष्ट करून उभे केलेले पीक काही तासांतच नष्ट झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आणि निराशा पसरली आहे. दरम्यान, या घटनेची माहिती प्रशासनाला देण्यात आली असून, अद्याप पंचनाम्याची प्रक्रिया सुरू झालेली नाही. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकरी चिंतेत असून, प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा व योग्य नुकसानभरपाईसह त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.या घटनेमुळे वाठवडा परिसरात शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या असून, शासनाने तातडीने लक्ष घालून दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ढोराळा शिवारात गारपीटीचा तडाखा: द्राक्ष-आंब्यासह पिकांचे मोठे नुकसान





आरंभ मराठी । गोविंदपूर

कळंब तालुक्यातील ढोराळा परिसरात मंगळवारी सायंकाळी झालेल्या जोरदार गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ढोराळा, गोविंदपूर, देवधानोरा, बोरगाव या भागांना गारपिटीसह मुसळधार पावसाने झोडपून काढले. या गारपिटीमुळे रस्ते व शेतांमध्ये गारांचा थर साचलेला दिसून आला. विशेषतः द्राक्ष, आंबा, ऊस, ज्वारी यांसारख्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. दरम्यान, ढोराळा येथील शेतकरी जयश्री विठ्ठल चौधरी, प्रविण विठ्ठल चौधरी आणि नारायण गणपती चौधरी यांच्या विहिरीवरील सौरऊर्जा प्लेटांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# लाखो रुपये खर्चूनही नळ कोरडेच; पळसप ग्रामपंचायतीवर महिलांचा संताप मोर्चा

## पाण्यासाठी गावाची भटकंती, आंदोलन तीव्र करण्याचा गावकऱ्यांचा इशारा

आरंभ मराठी । पळसप

**पळसप गावातील पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत असून, शासनाकडून पाणीपुरवठा योजनांवर लाखो रुपये खर्च करण्यात आले तरीही नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर गावातील महिलांनी एकत्र येत ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.**



गेल्या काही महिन्यांपासून पळसप गावातील नळ कोरडेच पडले असून, काही भागात महिना-दोन महिने पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. परिणामी महिलांना दररोज लांब अंतरावर जाऊन पाणी आणावे लागत असून त्यांच्या वेळ, श्रम आणि आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे. काही ठिकाणी पाण्यासाठी वादावादीच्या घटनाही घडत असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, गावात विविध पाणीपुरवठा योजनांतर्गत पाईपलाईन टाकणे, पाण्याच्या टाक्या उभारणे व आवश्यक साहित्य खरेदी यावर मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने "कामे झाली कुठे आणि पैसे गेले कुठे?" असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.या पार्श्वभूमीवर संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढत "आम्हाला पाणी मिळाल्याशिवाय येथून उठणार नाही," असा इशारा दिला. विशेष म्हणजे, मोर्च्यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात प्रशासक किंवा ग्रामसेवक अनुपस्थित असल्याने महिलांनी अधिक संताप व्यक्त केला. "आमच्या समस्या मांडायच्या तरी कोणाकडे?" असा प्रश्न उपस्थित करत नागरिकांनी प्रशासनातील गोंधळावरही बोट ठेवले. सध्या प्रशासक म्हणून नेमकी जबाबदारी कोणाकडे – सरपंच की विस्तार अधिकारी – याबाबतही नागरिकांमध्ये संभ्रम असल्याचे दिसून आले. मोर्चादरम्यान अनेक महिलांनी आपल्या व्यथा मांडताना सांगितले की, दररोज तासन्तास पाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागते. घरातील लहान मुले आणि वृद्धांची मोठी गैरसोय होत आहे. शासन लाखो रुपये खर्च करत असतानाही पाणी मिळत नसणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. नंतर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत महिलांशी संवाद साधला व लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. मात्र, परिस्थितीत सुधारणा न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महिलांनी दिला आहे. पळसपमधील पाणीटंचाई ही केवळ काही भागापुरती मर्यादित नसून, अपवाद वगळता संपूर्ण गावाला याचा फटका बसत आहे. त्यामुळे हा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे

# समुपदेशन केंद्रांचा आधार ठरला जीवनदायी

## एका वर्षात ४२८ महिलांना दिलासा, नात्यांना मिळाली नवी दिशा



आरंभ मराठी । धाराशिव

मानसिक तणाव, कौटुंबिक वाद आणि सामाजिक अडचणींमुळे अनेकदा व्यक्ती एकटेपणाच्या गर्तेत अडकून पडते. अशा वेळी योग्य मार्गदर्शन आणि भावनिक आधार मिळाल्यास आयुष्याला नव्याने दिशा मिळू शकते. याच उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून जिल्ह्यात कार्यरत असलेली समुपदेशन केंद्रे अनेकांसाठी आशेचा किरण ठरत आहेत. धाराशिव जिल्ह्यात सध्या चार पोलीस समुपदेशन केंद्रे पोलीस ठाण्यांच्या आवारात कार्यरत आहेत. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत या केंद्रांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. धाराशिव केंद्राने २०९, वाशी केंद्राने २४, कळंब केंद्राने ३८ तर उमरगा केंद्राने १५७ प्रकरणांतील महिलांचे समुपदेशन केले. अशा प्रकारे एकूण ४२८ महिलांना या केंद्रांद्वारे आधार देण्यात आला आहे. समुपदेशन केंद्रे ही मानसिक, भावनिक, सामाजिक किंवा कौटुंबिक समस्यांवर मार्गदर्शन व मदत मिळवण्यासाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह ठिकाणे मानली जातात. येथे मानसिक तणाव, नैराश्य, चिंता यावर मार्गदर्शन केले जाते. तसेच कौटुंबिक व वैवाहिक समुपदेशन, मुलांचे व किशोरवयीन समुपदेशन आणि महिलांवरील कौटुंबिक हिंसा किंवा छळ यांसारख्या संवेदनशील विषयांवर विशेष सल्ला दिला जातो. या केंद्रांचा मुख्य उद्देश म्हणजे अडचणीत सापडलेल्या महिलांना व कुटुंबांना योग्य सल्ला, मानसिक आधार आणि समस्यांवर सकारात्मक तोडगा उपलब्ध करून देणे. अनेक वेळा किरकोळ गैरसमजांमुळे निर्माण झालेले वाद समुपदेशनातून मिटवले जातात आणि तुटलेली नाती पुन्हा जुळून येतात. त्यामुळे केवळ समस्या सोडवणे नव्हे, तर नातेसंबंध जपणे आणि समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करणे हेही या केंद्रांचे महत्त्वाचे ध्येय ठरत आहे. महिला, बालक, कुटुंबातील सदस्य तसेच मानसिक तणाव किंवा इतर कोणत्याही समस्यांचा सामना करणारी कोणतीही व्यक्ती या केंद्रांचा लाभ घेऊ शकते. गेल्या एका वर्षात समुपदेशन केंद्रांनी केवळ आकडेवारीत यश मिळवले नाही, तर अनेक कुटुंबांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणत माणुसकीची उब जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

# अल्पवयीन बालिकेचा विवाह उधळला प्रशासनाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला



आरंभ मराठी । धाराशिव

अल्पवयीन मुलीचे गुपचूप लवकर लग्न उरकण्याच्या तयारीत असलेल्या ठिकाणी प्रशासनाचे पथक वेळेत पोहोचल्यामुळे हा अल्पवयीन विवाह सोहळा होऊ शकला नाही. ही घटना बुधवारी (दि.२२) भूम तालुक्यात घडली. भूम तालुक्यातील मौजे आष्टा येथे १३ वर्षीय अल्पवयीन बालिकेचा विवाह होत असल्याची गोपनीय माहिती मिळताच जिल्हा बाल संरक्षण कक्ष धाराशिव आणि चाईल्ड हेल्पलाइन १०९८ यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मोठी कारवाई करत बालविवाह रोखण्यात यश मिळवले. मात्र, पथक पोहोचण्यापूर्वीच संबंधित बालिकेचे आई-वडील तिला घेऊन पसार झाले होते. त्यामुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले. यानंतर अधिकाऱ्यांनी तातडीने पाठपुरावा सुरू ठेवत परिसरात चौकशी केली असता बालिकेला सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवाडी येथे नेण्यात येत असल्याची माहिती समोर आली. ही माहिती मिळताच बालकल्याण समिती सोलापूर यांच्याशी समन्वय साधण्यात आला. तसेच संबंधित पालकांशी सतत फोनवर संपर्क साधून त्यांना समजावण्यात आले. अखेर प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश येत पालकांनी बालिकेसह परत येण्यास मान्यता दिली. यानंतर बालिकेला ताब्यात घेऊन बालकल्याण समिती धाराशिव यांच्या आदेशानुसार बालाजी नगर, धाराशिव येथील 'शक्ती सदन' मध्ये तात्पुरता प्रवेश देण्यात आला आहे. सध्या बालिकेची सुरक्षिततेची सर्व काळजी घेतली जात आहे. या कारवाईवेळी गावातील ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा बाल संरक्षण कक्षातील प्रज्ञा बनसोडे, चाईल्ड हेल्पलाइन १०९८ चे अभय काळे व पल्लवी पाटील, बिट अंमलदार तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून अशा घटना रोखण्यासाठी प्रशासन सतर्क आहे. नागरिकांनीही अशा प्रकारांची माहिती त्वरित चाईल्ड हेल्पलाइन १०९८ वर देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे

# ढोकी प्राथमिक आरोग्य केंद्राची सभापती गोकर्णा कदम यांच्याकडून पाहणी

## रिक्त पदे भरण्याचे आश्वासन



आरंभ मराठी । धाराशिव

ढोकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम यांनी भेट देऊन सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी मेडिकल ऑफिसर, अधिकारी व कर्मचारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिरी यांच्यासमवेत विविध विभागांचा आढावा घेतला.सभापती कदम यांनी आधुनिक डिलिव्हरी रूम, नवजात शिशु विभाग, पुरुष व महिला रुग्ण विभाग, औषध भांडार तसेच लसीकरण विभागाला भेट देत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. आरोग्य केंद्रात दररोज सरासरी २०० ते २५० बाह्य रुग्ण सेवा घेत असल्याची माहिती मेडिकल ऑफिसर यांनी दिली. यावेळी आरोग्य केंद्रातील रिक्त पदांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यावर सभापती कदम यांनी रिक्त पदे भरण्यासाठी वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेत त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिरी, गटशिक्षणाधिकारी आसरा साहेब, आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचे स्वीय सहाय्यक रविराज चौगुले आदी उपस्थित होते.

# रस्त्यालगतच्या लाईटच्या खांबामुळे अपघाताचा धोका वाढला, रुंदीकरणालाही अडथळा



आरंभ मराठी । माडज

उमरगा तालुक्यातील माडज पाटी परिसरात रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर लाईटचे खांब उभारले जात असून हे खांब अनेक ठिकाणी रस्त्याच्या अगदी जवळ बसवण्यात आल्याचे दिसून येत आहे. यामुळे वाहनचालकांसाठी अडथळा निर्माण होण्याची शक्यता असून भविष्यात अपघाताचा धोका वाढण्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या खांबांमुळे रस्ता अरुंद झाल्याचा भास होऊन वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. काही ठिकाणी हे खांब नियमांकडे दुर्लक्ष करून उभारण्यात आल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. याशिवाय, भविष्यात रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतल्यास हेच खांब मोठा अडथळा ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे विकासकामांमध्ये विलंब होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग उमरगा यांनी ९ सप्टेंबर २०२५ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग धाराशिव यांना लेखी कळवले असल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या मते, संबंधित कंत्राटदार तसेच पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्पाशी संबंधित खासगी कंपनीकडून हे काम करण्यात येत असून यामुळे शेतकरी व वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होऊ शकतो. प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन नियमबाह्य पद्धतीने उभारण्यात आलेले लाईटचे खांब हटवावेत किंवा योग्य ठिकाणी स्थलांतरित करावेत, तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी माडज ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

आरंभ मराठी

बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुपच्या वतीने भव्य मिरवणूक, महामानवास अभिवादन

# जय भीमच्या जयघोषाने धाराशिव दणाणले

## संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत भीमजयंती उत्साहात साजरी

## अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांचा मिरवणुकीत सहभाग

आरंभ मराठी । धाराशिव

विश्वभूषण, बोधिसत्व, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.22) सायंकाळी पारंपारिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून जयंती उत्सव सोहळा साजरा करण्यात आला. मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती आणि हभप, भन्तेजी, मौलानांसह अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांच्या सहभागाने मिरवणुकीचा उत्साह अधिकच वाढला.गेल्या 25 वर्षांपासून अठरापगड जाती-समूहांना एकत्रित करत बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे मार्गदर्शक धनंजय (नाना) शिंगाडे यांनी जयंती उत्सव समिती अध्यक्षपदाचा बहुमान सर्व जाती-धर्मातील व्यक्तींना दिला आहे. शहरातील क्रांती चौक भीमनगर येथे जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, जयंती समितीचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे, समितीचे अध्यक्ष तथा सांजा गावचे सरपंच प्रवीण सूर्यवंशी, कार्याध्यक्ष सुधीर पवार, विशाल शिंगाडे, जातमुक्त गाव करणारे सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे पाटील, मसूद शेख ॲड.परवेज काझी, पंकज काटे, बार्शीचे उद्योजक सुनील भराडीया, मौलाना अय्युब कासमी, मौलाना मुफ्ती रहेमतुल्ला, मौलाना जाफर खानसाब, मौलाना सजीयोद्दीन शेख, मौलाना कारी कलीमसाब,



### अन्यायाची जाणीव झाली तर अन्याय दूर होईल – मनोज जरांगे पाटील

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जातीधर्माचा आदर केला. त्यांच्याच विचाराचा वारसा घेऊन मी समाजासाठी मैदानात उतरलो आहे समाजातील सर्व घटकांमी आपल्यावरील अन्यायाची जाणीव झाली पाहिजे. त्यासाठी संघर्ष केला तर अन्याय दूर होईल. आपल्यावर झालेल्या अन्यायाला दूर करायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या लढ्याची जाणीव आपण करून घ्यावी.

भन्ते सुमेधजी नागसेन, भन्ते कमल धम्मो, भन्ते संघदूत, भन्ते विनीत धम्म, भन्ते सुमित बोधी, हभप प्रकाश बोधले महाराज, हभप धनंजय महाराज सांजेकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून त्रिशरण व पंचशील घेण्यात आले. कार्यक्रमात मनोज जरांगे पाटील यांचा शाल, पुष्पहार व सन्मानपत्र देऊन विशेष सन्मान उपस्थित मौलाना, भन्तेजी, हभप यांच्या हस्ते करण्यात आला. तर सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे पाटील, अधीक्षक अभियंता संजय आडे यांचा सत्कार समितीच्या वतीने करण्यात आला. आशीर्वचन मार्गदर्शन हभप प्रकाश महाराज बोधले, मौलाना जाफर महंमदअली खान, भन्ते सुमेधजी नागसेन यांनी केले. जातमुक्त गाव संकल्पनेचे प्रेरणास्थान शरद आरगडे पाटील यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाशवाणीचे निवेदक दौलत निपाणीकर यांनी तर आभारप्रदर्शन समितीचे कार्याध्यक्ष सुधीर पवार यांनी केले.

# वडगाव (सिद्धेश्वर) येथे 'पंचायत समिती आपल्या दारी' उपक्रम

## जनता दरबारातून नागरिकांच्या समस्या मार्गी





आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील वडगाव (सिद्धेश्वर) येथे 'पंचायत समिती आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. धाराशिव पंचायत समितीच्या सभापती सौ. गोकर्णा गोपाळ कदम व उपसभापती प्रमोद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा दरबार पार पडला. आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार तालुक्यातील पंचायत समितीच्या प्रत्येक गणात जनता दरबारांचे आयोजन करण्यात येत असून, त्याच अनुषंगाने २२ एप्रिल रोजी वडगाव गणात हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास जि.प. सदस्य सरवदे, पंचायत समिती सदस्य प्रशांत रणदिवे, सहाय्यक गटविकास अधिकारी संतोष नलावडे, महिला व बालविकास अधिकारी रेश्मा पठाण, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एम. डी. गिरी यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीचे विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तसेच वडगाव गणातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, आशा व अंगणवाडी सेविका, मदतनीस, बुथ प्रमुख व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी नागरिकांनी घरकुल, मनरेगा (एमआरजीएस), कृषी पाणीपुरवठा, पशुसंवर्धन, आरोग्य तसेच महिला व बालविकास विभागाशी संबंधित विविध समस्या मांडल्या. त्यापैकी अनेक समस्यांचे त्वरित जागेवरच निवारण करण्यात आले. उर्वरित समस्यांसाठी निवेदने स्वीकारून त्या सोडविण्यासाठी आठ दिवसांचा अवधी देण्यात आला. याशिवाय उपस्थित अधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देत नागरिकांना त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वडगावचे ग्रामविकास अधिकारी सुदर्शन घोगरे यांनी केले.